# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.08.2025** **वार:सोमवार**

---

1. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचं सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते उद्घाटन,
2. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी एनडीएकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा,
3. निवडणूक आयोग कुठल्याही राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करत नाही-केंद्रीय निवडणूक आयोगाचं स्पष्टीकरण,
4. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सोलापूरमध्ये बांधलेल्या सदनिकांचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरण, आणि
5. राज्याच्या अनेक भागात जोरदार पाउस; आगामी तीन चार दिवसांतही मुसळधार पावसाचा इशारा.

**सर्किटबेंच-कोल्हापूर**

'कोल्हापूर सर्कीट बेंच हे समाजातील दुर्गम भागातील पक्षकारांच्या सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी मैलाचा दगड ठरेल; इथल्या कामकाजातून राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असं न्यायदान केलं जाईल', असा विश्वास देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी काल कोल्हापूर इथं व्यक्त केला. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचचं उद्घाटन सरन्यायाधीशांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती अलोक आराधे या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना सरन्यायाधीश म्हणाले.....

**वीस-पंचवीस दिवसाच्या कालखंडामध्ये पूर्ण इमारतीचा कालखंड बदलून पूर्ण इमारतीच रूप बदलून त्याच ओरिजिनल जे ग्रॅड्युअर आहे ते ग्रॅड्युअर कायम ठेवून त्यांनी एक अतिशय सुंदर अशी इमारत हाय कोर्टाला साजिशी अशी निर्माण केलेली आहे. त्याबद्दल मी त्यांचं मनःपूर्वक अभिनंदन करतो. मनःपूर्वक आभार मानतो. आणि मला खात्री आहे, मी नेहमीच म्हणत असतो की महाराष्ट्र ज्युडिशियल इन्फ्रास्ट्रक्चर च्या मागे बिलकुल मागे नाहीये. महाराष्ट्रातल्या ज्या ज्या बिल्डिंग च मी उद्घाटन केलेलं असेल त्या बिल्डिंग मध्ये जर पाहिलं तर अतिशय उच्च दर्जाच्या अशा बिल्डिंग झालेल्या आहेत. आणि माझ्या वाते पीडब्ल्यूडी ने जे वीस दिवसात कोल्हापूर खंडपीठ बद्दल करून दाखवलं की जे टीका करतात की महाराष्ट्रामध्ये ज्युडिशियल इन्फ्रास्ट्रक्चर खूप पाठीमागे आहे. त्यांना कार्याने दिलेलं उत्तर आहे. शब्दानी नाही.**

'या सर्किट बेंचच्या माध्यमातून कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासाचं नवं दालन सुरू झालं आहे', असं प्रतिपादन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं. तर कोल्हापूरात सर्किट बेंच झाल्यामुळे या परिसरातल्या पक्षकारांचा पैसा आणि वेळ वाचेल, न्यायप्रक्रिया जलद होईल, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राजेश क्षीरसागर, खासदार शाहू महाराज छत्रपती, मुंबई उच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती चंद्रशेखर, सर्किट बेंचसाठी नियुक्त केलेले न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती शिवकुमार डिगे, न्यायमूर्ती शर्मिला देशमुख, न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**उपराष्ट्रपती उमेदवार**

उपराष्ट्रपतीपदासाठी होणाऱ्या निवडणुकीकरता राष्ट्रीय लोकशाही आघाडीकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. भारतीय जनता पार्टीच्या संसदीय मंडळाची बैठक काल झाली; त्यामध्ये याबाबत निर्णय घेण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री आणि भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा, केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह यांच्यासह अन्य सदस्य या बैठकीला उपस्थित होते. पुढच्या महिन्याच्या 9 तारखेला उपराष्ट्रपतीपदासाठी निवडणूक होणार आहे. जगदीप धनखड यांनी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा दिल्यामुळे ही निवडणूक होत आहे.

**निवडणूक आयुक्त**

'निवडणूक आयोग कुठल्याही राजकीय पक्षांमध्ये भेदभाव करत नाही, आयोगासमोर सर्व पक्ष समान आहेत', असं मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी म्हटलं आहे. बिहारमधील मतदार याद्यांचं सखोल पुनरीक्षण तसंच महाराष्ट्रातल्या निवडणूकांबाबत करण्यात येणाऱ्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर ज्ञानेश कुमार यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषद घेतली. निवडणूक आयोग आपल्या संविधानिक कर्तव्यापासून मागे हटणार नाही; असं त्यांनी स्पष्ट केलं.

मत चोरीसारखे शब्द वापरणं हा संविधानाचा अपमान नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला; काहीजण दुहेरी मतदानाचा आरोप करतात, परंतु जेव्हा पुरावे मागितले जातात, तेव्हा कोणतंही उत्तर दिलं जात नाही; अशा खोट्या आरोपांना निवडणूक आयोग किंवा कोणताही मतदार घाबरणार नाही, असं ठाम प्रतिपादन ज्ञानेश कुमार यांनी केलं. देशातील सर्व मतदारांच्या पाठीशी निवडणूक आयोग खंबीरपणे उभा असल्याचं सांगून ते म्हणाले...

**जब चुनाव आयोग के कंधे पर बंदूक रखकर भारत के मतदाताओं को निशाना बनाकर राजनीति की जा रही हो, तो आज चुनाव आयोग सबको स्पष्ट करना चाहता है, की चुनाव आयोग निडरता के साथ सभी गरीब, अमीर, बुजुर्ग महिला, युवा सहित सभी वर्गों और सभी धर्मों के मतदाताओं के साथ बिना किसी भेदभाव के चट्टान की तरह खड़ा था, खड़ा है, और खड़ा रहेगा।**

**राज्य विधानसभा**

महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी ही याचिका दाखल केली असून, यात निवडणूक आयोगाने सायंकाळी 6 नंतर झालेल्या 76 लाख मतांची माहिती जतन करून न ठेवल्याबाबत आक्षेप नोंदवला आहे.

**सोलापूर आयटी**

सोलापूरमध्ये आयटी पार्क उभे केल्यास युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध होईल; जिल्हा प्रशासनाने जागा शोधल्यास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या माध्यमातून आयटी पार्क उभारण्यात येईल, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. प्रधानमंत्री आवास योजना शहरी अंतर्गत म्हाडातर्फे आणि इतर गृहनिर्माण संस्थांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या 1 हजार 348 सदनिकांच्या वितरण प्रसंगी ते काल सोलापूर इथं बोलत होते. सोलापूरमध्ये बंद जलवाहिनीने पाणी आणण्यात येणार आहे. सांडपाणी प्रकल्पाच्या जागेचा प्रश्न दूर करण्यात आला आहे; शहरातील जल वितरण वाहिनीच्या 850 कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता देण्यात आली असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

**अकोला-लंडन**

अकोला शहरात 10 हजार विद्यार्थ्यांनी शाडू मातीपासून गणेश मूर्ती बनवली असून शहराचे नाव लंडन बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंदवण्यात आलं आहे. निलेश देव मित्र मंडळाच्या माध्यमातून राबवण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांच्या करण्यात आलं. जिल्हाधिकारी अजित कुंभार, महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यावेळी उपस्थित होते.

**अंमली पदार्थ विरोधी जनजागृती**

अमंली पदार्थ विरोधी जनजागृती मोहीमेअंतर्गत परभणी पोलिसांच्या वतीनं शहरात सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी उपस्थितांना नशा मुक्तीची शपथ दिली.

**टेट निकाल**

शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धीमत्ता चाचणी परीक्षा 2025 चा निकाल आज जाहीर करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती कळवली आहे.

**पाऊस**

राज्यात अनेक ठिकाणी काल जोरदार पाऊस पडला; त्यामुळे नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. **बुलडाणा** जिल्ह्यातील संग्रामपूर जळगाव नांदुरा खामगाव सिंदखेड राजा चिखलीसह अनेक तालुक्यात अतिवृष्टीनं मोठं नुकसान झालं आहे. **धाराशिव** जिल्ह्यात जोरदार पावसामुळे मांजरा, तेरणा आणि वासेरा या तिन्ही नद्यांना पूर आला असून अनेक गावांत शेतपिकांचं आणि घरांचं नुकसान झालं आहे. पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या खोदला गावच्या एका व्यक्तीचा मृतदेह शोधण्याचं काम सुरू असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**हिंगोली** जिल्ह्यातील विविध धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे जलसंपदा विभागान नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. **परभणी** जिल्ह्यात सततच्या पावसाने ओढे, नाले आणि नद्यांना पूर आला असून सोयाबीन, कापूस, मूग, उडीद, हळद, ऊस पिकांसह भाजीपाल्याचं नुकसान झालं आहे. **नांदेड** जिल्ह्यात पावसामुळे अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे.

**रत्नागिरी** जिल्ह्यात पावसाचा जोर कायम असून खेडमधल्या जगबुडी नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. नारिंगी नदीलाही पूर आल्यामुळे खेड-दापोली मार्गावरची वाहतूक ठप्प झाली आहे. **कोल्हापूरा**त काल पुन्हा

पावसाचा जोर वाढला. गेल्या दोन दिवसांपासून धरणक्षेत्रातही मुसळधार पाऊस सुरू झाल्याने पाणी पातळीत झपाट्याने वाढ होत आहे. परिणामी धरणाचे एकूण 3 स्वयंचलित दरवाजे उघडले असून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू आहे.

**ओला दुष्काळ**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू असल्याने पिकांचं मोठे नुकसान झालं आहे. राज्य सरकारने तातडीने शेतकऱ्यांना पंचनामे न करता मदत जाहीर करावी तसेच राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची तसंच विशेष अधिवेशन घेण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केली आहे.

**हवामान**

राज्यात पुढील 24 तासासाठी पुणे घाट भागात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला असून पालघर, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या जिल्ह्यात तसेच सातारा घाट, कोल्हापूर घाट या भागात मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मच्छिमारांना समुद्रात न जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. येत्या 21 ऑगस्टपर्यंत राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला असून राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्याचं राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आलं आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.